MHBU180005082021

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०१.०७.२०२१ |
| नोंदणी दिनांक | ०१.०७.२०२१ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०६.०५.२०२६ |
| कालावधी | ०४ व. १० म. ०५ दि. |

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, संग्रामपुर यांच्या न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी– एस. एल. रामटेके)**<br>(घोषीत दिनांक ०६.०५.२०२६)<br>**नियमित फौजदरी खटला क्रं. १५०/२०२१, निशाणी क्रं. ६३**<br>**गु.र.नं. १४५/२०२० पोलीस ठाणे सोनाळा, बुलडाणा.** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | डॉ. एफ. ए. अहमद |
| आरोपी | १. साईनाथ दादाराव शिंदे,<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>२. गजानन दादाराव शिंदे,<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>३. हराबाई दादाराव शिंदे,<br>वय – ७१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>सर्व रा. पिंगळी जहांगीर, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. के. पी. बावस्कर |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १४.०६.२०२० |
| पहिली खबर दिनांक | १४.०६.२०२० |
| दोषारोपत्राचा दिनांक | ०१.०७.२०२१ |
| दोषारोपत्र ठेवल्याचा दिनांक | ०८.१२.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साईनाथ दादाराव शिंदे | | | ३२४, ३२३, | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | गजानन दादाराव शिंदे | २२.०२.२०२१ | २२.०२.२०२१ | ५०४ सह कलम ३४ भा.दं.वि., १८६०. | निर्दोष मुक्त केले. | – | निरंक |
| ३. | हराबाई दादाराव शिंदे | | | | | | |

## भाग–क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | बालीबाई ब्रीजलाल शिंदे | फिर्यादी |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | ४३ | तोंडी रिपोर्ट |
| २ | ४४ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | ४७ | मेडिकल सर्टिफिकेट |
| ४ | ४८ | क्युरी रिपोर्ट |
| ५ | ४९ | घटनास्थळ पंचनामा |
| ६ | ५० | मुद्येमाल पावती |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | २६ | दोषारोप |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | ४६/२०२० | एक आडजात काठी |

## – न्यायनिर्णय –

(घोषणा दिनांक – ०६.०५.२०२६)

आरोपींविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४

सह कलम ३४ अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

२. <u>**अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की,**</u>

दिनांक १४/०६/२०२० रोजी १७.०० वाजताचे सुमारास पिंगळी जहांगीर, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथे फिर्यादीचा भाऊ इश्वर याचा आरोपी क्र. १ व २ हे गावाच्या बाहेर पाठलाग करुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे भावास तु माझी बहीण शांताबाई सोबत कशाला भांडण करतो तुला जास्त माज आला काय असे म्हणून आरोपी क्र. १ व २ यांनी शिवीगाळ केली व मारहाण केली. भांडण सुरु असतांना फिर्यादी ही भांडण सोडविण्याकरिता गेली असता तिला आरोपी क्र. १ याने लाकडी काठी ने मारहाण केली तसेच त्या ठिकाणी आरोपी क्र. ३ ही आली व तिने सुध्दा फिर्यादीस व फिर्यादीचे भावास लाथा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलिस स्टेशनला फिर्याद दिली.

३. दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध गु.रं.क्र. १४५/२०२० वरील कलमांप्रमाणे नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. ललितकुमार कुंजाम यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. तपासाअंती आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध नि.क्र. २६ खाली वर नमुद कलमाप्रमाणे आरोप निश्चित करुन आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी गुन्हा केल्याचे नाकारले व संपरिक्षेची मागणी केली.

५. उभयपक्षांच्या विद्वान वकिलांनी प्रकरणाचा निकाल गुणाअवगुणावर लावण्याची विनंती केली आहे. अभिलेखावरील पुरावा व उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकुण खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील माझे निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहेः

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, दिनांक १४/०६/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास पिंगळी जहांगीर, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथे आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व तिचे भावास काठीने मारुन इच्छापूर्वक गंभीर स्वरुपाची दुखापत पोहोचवली व त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व तिचे भावास लाथा बुक्यांनी इच्छापूर्वक स्वरुपाची दुखापत पोहोचवली व त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीस उद्येशपूर्वक शिवीगाळ करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभित केले व त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ४. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

# कारणमीमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत–**

६. सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चेसाठी घेण्यात आले आहेत.

७. सरकार पक्षाने फिर्यादी /स.सा.क्र.१ बालीबाई ब्रीजलाल शिंदे यांची साक्ष नि.क्र. ४२ वर नोंदवलेली आहे. दोन्ही पक्षांनी नि.क्र. ३९ वर त्यांच्यामध्ये झालेली तडजोड पुरसीस सादर केली आहे. आरोपींतर्फे घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र, क्युरी रिपोर्ट, मुद्येमाल पावती मान्य करण्यात आले आहे. आरोपींविरोधात कोणताही पुरावा आला नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता (फौ.प्र.सं.) चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदवण्यात आलेली नाही.

८. फिर्यादी बालीबाई ब्रीजलाल शिंदे (अ.सा.क्र.१) यांनी सरतपासात कथन केले की, त्या आरोपींना ओळखतात. ते त्यांच्या गावचे आहेत. दिनांक १४.०६.२०२० रोजी काय घटना घडली हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने सरकारी वकीलांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारुन देखिल अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल असा पुरावा अभिलेखावर आला नाही.

९. ज्याअर्थी फिर्यादी साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने इतर साक्षीदारांना तपासुन देखील अभियोग पक्ष प्रस्तुतचा गुन्हा आरोपींविरोधात शाबित करु शकणार नाही. या कामी फिर्यादी साक्षीदार हे महत्त्वाचे साक्षीदार असल्याने त्यांच्या साक्षीवरच अभियोग पक्षाची भिस्त अवलंबून आहे. फिर्यादी बालीबाई ब्रीजलाल शिंदे (अ सा.क्र.१) यांनी त्या आरोपींना ओळखतात. ते त्यांच्या गावचे आहेत. दिनांक १४.०६.२०२० रोजी

काय घटना घडली हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच, त्यांनी फिर्यादीमधील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केलेले आहे. सबब, त्यांची साक्ष अभियोग पक्षास कोणत्याही प्रकारे उपयुक्त ठरत नाही. सदरचा कागदोपत्री पुरावा हा निव्वळ फिर्यादीच्या जबाबाला दुजोरा देणारा असतो. तसेच सदर साक्षीदाराने त्यांच्यात व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादी व्यतिरिक्त सरकार पक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. फिर्यादीने सरकार पक्षास साथ दिली नसल्याने इतर साक्षीदार तपासूनही आरोपींविरोधातील कोणताही गुन्हा संशयापलीकडे शाबीत होऊ शकत नाही. अभिलेखावरील एकंदरीत पुरावा लक्षात घेता आरोपीविरोधात शाश्वत शंकेपलीकडे कोणताही गुन्हा शाबीत होत नाही. सबब, मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. मुद्दा क्र. ४ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

## आदेश

१. आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

३. प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजेच एक आडजात काठी मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात येत आहे)

SWAPNIL LILADHAR RAMTEKE

Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2026.05.06 17:52:20 +0530

**(श्री. स्वप्निल लि. रामटेके)**

दिनांक :– ०६.०५.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संग्रामपुर

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. जी. जैन

कार्यालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संग्रामपुर

लघुलेखक